MAHA

महाराष्ट्र स्टेट ईलेक्ट्रिसिटी ट्रान्समिशन कंपनी लिमिटेड

CIN NO. U40109MH2005SGC153646

अधीक्षक अभियंता यांचे कार्यालय

५०० किव्हो उदादिधा ग्रहण केंद्र (संवसु) मंडल पडघे ४२११०१,ता.भिवंडी, जि.ठाणे (महाराष्ट्र राज्य)

दूरध्वनी क्रं.: ९७६९००६१९१(कार्या), E-mail: se7300@mahatransco.in, Web. www.mahatransco.in

क्र.:अ.अ./उदादिधा/मंडळ/पडघे/स्था. No 00597 दि. 21 MAY 2021

विषय :- सुशिक्षित बेरोजगार स्थापत्य अभियंता यांना व सुशिक्षित बेरोजगारांनी स्थापन केलेल्या सहकारी संस्थांना लॉटरी पध्दतीने कामे वाटप करण्यासंबंधी प्रथम लॉटरी (२०२१-२२) बैठक दि.३१.०५.२०२१ (सोमवार) ला घेणेबाबत.

संदर्भ :-

१.I, E&L Dept. GOM GR No. Misc.-2015/CR-63/Ernergy-5 Dtd: 26.03.2015.

२.MSETCL/CO/Tr. O&M/SE-II/EE-VIII/12883 Dtd: 05.12.2016.

३.C. O. Letter vide No.1046 Dtd: 25.01.2018.

सुशिक्षित बेरोजगार अभियंता (स्थापत्य) यांना व सुशिक्षित बेरोजगारांनी स्थापन केलेल्या सहकारी संस्थांना विनास्पर्धा थेट लॉटरी पध्दतीने कामे वाटपाची योजना महाराष्ट्र शासनाच्या निर्णय संदर्भ क्रं. (१) अन्वये अधीन राहून महापारेषण कंपनीने संदर्भ क्रं. (२) अन्वये लागू केली आहे.

सदरील नोटीस ही दि.२४.०५.२०२१ रोजी प्रसिद्धीस देण्यात येत असून प्रसिध्दीच्या दिनांकापासून ३१.०५.२०२१ पर्यत महापारेषण कंपनीच्या संकेतस्थळावर तसेच उ. दा . दि. धा. संवसु मंडळ, पडघे या कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रसिध्दीस्तव उपलब्ध असेल.

या योजने अंतर्गत अधिक्षक अभियंता, उ. दा . दि. धा. संवसु मंडळ, पडघे या कार्यालयात दि.३१.०५.२०२१ रोजी सकाळी ११.३० वाजता खालील कामांसाठी खालील नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून प्रथम लॉटरी (२०२१-२२) बैठक आयोजित करण्यात येत आहे.

| अ. क्रं | कामाचे नाव | रक्कम (सर्व करासहित) | जिल्हा |
|---|---|---|---|
| १) | Annual contract for daily housekeeping & up keeping of 500kV HVDC receiving station Padghe for year 2021-22 | 6,54,732.00 | ठाणे |

अटी व शर्ती:

१) सुशिक्षित बेरोजगार स्थापत्य अभियंता व सुशिक्षित बेरोजगार सहकारी संस्था कार्यकारिणी प्रतिनिधींनी लॉटरीसाठी उपस्थित राहताना खालील तपशील सोबत आणणे बंधनकारक आहे.

अ महाराष्ट्र शासनाची स्थापत्य कामासाठीची वैध अनुज्ञाती/ बेरोजगार सहकारी संस्था नोंदणी प्रमाण प्रत्र.

ब. सर्व शासकीय /निमशासकीय/खाजगी आस्थापनेमध्ये एकूण केलेल्या व चालू असलेल्या कामाचा तपशील.

क. रहिवासी प्रमाणपत्र व सर्व मूळ कागदपत्रे / सहकारी संस्थेसाठी संस्थेची मंजूर घटना (By laws copy Approved / Accepted ).

२) संबंधित अधिक्षक अभियंता यांच्या कार्यक्षेत्रात रहिवासी असलेल्या बेरोजगार अभियंत्याला / सुशिक्षित बेरोजगारांनी स्थापन केलेल्या सहकारी संस्थेस लॉटरीमध्ये सहभाग घेता येईल. कार्यक्षेत्राबाहेरील बेरोजगार अभियंता तसेच सुशिक्षित बेरोजगार सहकारी संस्थेस लॉटरीमध्ये सहभाग घेऊ शकणार नाही.

३) ही सवलत अभियांत्रिकी पदवी / पदविका उत्तीर्ण झाल्याच्या दिनांकापासून १० वर्षाच्या आत नोंदणी केलेल्या सुशिक्षित बेरोजगार स्थापत्य/ विद्युत अभियंत्याना (विद्युत व स्थापत्य) लागू होईल. लॉटरी पध्दतीने कामे वाटपाच्या वेळेस सदर स्थापत्य अभियंता हा सुशिक्षित बेरोजगार असावा, तसेच तो कोणत्याही प्रकारचे शिक्षण घेत नसावा. उपस्थित असलेल्या सुशिक्षित बेरोजगार स्थापत्य अभियंत्याने दिलेली माहिती खोटी आढळून आल्यास त्याला महापारेषण कंपनीने प्रदान केलेला नोंदणीकृत परवाना रद्द करण्यात येईल, तसेच महापारेषण कंपनीने या योजनेंतर्गत काढलेल्या पुढील कोणत्याही लॉटरी प्रक्रियेमध्ये सहभागी होता येणार नाही व सदर अभियंत्यावर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

या लॉटरी प्रकियेने कामे मिळवण्यासाठी -

ख. सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांनी कामे घेण्याच्या दिवशीच्या ते सुशिक्षित बेरोजगार असल्याचे महाराष्ट्र शासनाच्या सेवायोजन कार्यालयाचे प्रमाणपत्र आणणे बंधनकारक आहे.

ग. सुशिक्षित बेरोजगार सहकारी यांना कामे घेण्याच्या दिवशीच्या त्यांचे सर्व सदस्य / सभासद सुशिक्षित बेरोजगार असल्याचे महाराष्ट्र शासनाच्या सेवायोजन कार्यालयाचे प्रमाणपत्र आणणे बंधनकारक आहे.

४) या लॉटरी प्रक्रियेसाठी अधिक्षक अभियंता, उ. दा . दि. धा. संवसु मंडळ, पडघे या कार्यालयात दि.३१.०५.२०२१ पर्यंत नोंदणी झालेले अर्ज ग्राहय धरण्यात येतील.

सदर लॉटरी बैठक दि.३१.०५.२०२१ रोजी सकाळी ११.३० वाजता, ५०० किव्हो उ.दा.दि.धा. ग्रहण केंद्र (संवसु) मंडल पडघे,ता.भिवंडी, जि.ठाणे पिनकोड ४२११०१ या कार्यालयात आयोजित करण्यात आली आहे. वरील सर्व अटी व शर्तीची पूर्तता करणा-या वैध सुशिक्षित बेरोजगार स्थापत्य अभियंता / बेरोजगार सहकारी संस्थांना आवाहन करण्यात येते की, त्यांनी नियोजित वेळेस कागदपत्राच्या सत्य प्रत सोबत या कार्यालयात उपस्थित राहावे.

अधीक्षक अभियंता,
उ. दा . दि. धा. संवसु मंडळ, पडघे

प्रत सादर:

१. कार्यकारी अभियंता (प्र ), उ. दा . दि. धा. संवसु मंडळ, पडघे (सदस्य)
२. कार्यकारी अभियंता, ५००कि. व्हो. ग्र. के. संवसु विभाग, पडघे (सदस्य)
३. व्यवस्थापक (वि.व.ले.) उ. दा . दि. धा. संवसु मंडळ, पडघे
४. सूचना फलक

वरीलप्रमाणे निर्धारित केलेल्या समिती सदस्यांसोबत नियोजीत वेळेत या कार्यालयात उपस्थित राहावे.